# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pr&o.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ३५-२३** **दिनांक ०१/०२/२०२३**

## अज्ञात ईसमाचा निर्घृण खुन करणा-या अज्ञात आरोपीतांची तसेच मयताची ओळख पटवुन आरोपीतांना ४८ तासात अटक - गुन्हे शाखा कक्ष २, वसई यांची कामगिरी.

दिनांक २७/०१/२०२३ रोजी १६.०० वा. चे पुर्वी वालीव पोलीस ठाण्याचे हद्दीत नायगांव पुर्व रिक्षा स्टँन्डचे ब्रिजखाली अनोळखी मयत इसम वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे याचे प्रेत नायगांव खाडीचे पाण्यातुन वाहत असल्याची माहिती वालीव पोलीस ठाण्यात प्राप्त झाल्याने वालीव पोलीस ठाणेत अं.मृ.रजि. नं. १५/२०२३ सी.आर.पी.सी. १७४ प्रमाणे अ.मृ. दाखल करण्यात आला होता. यातील मयत इसमाचे मृत्युचे निश्चित कारण समजण्यासाठी मयत याचे प्रेतावर पोस्टमार्टम करण्याकरता प्रेत जे.जे. हॉस्पीटल मुंबई येथे पाठविण्यात आले होते. तेथील डॉक्टरांनी कोणत्या तरी धारदार हत्याराने मयताचे गळयावर व डोक्यात वार केल्याने त्याचा मृत्यु झाल्याचे शवविच्छेदन अहवालात नमुद केले होते. त्या अनुषंगाने पो.उप.निरी. जिंकलवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वालीव पोलीस ठाणेत दिनांक २९/०१/२०२३ रोजी गु. रजि.नं. १०५/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गंभीर स्वरुपाचा खुनाचा गुन्हा केल्यानंतर पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मयतास खाडीच्या पाण्यात फेकुन दिल्याने फुगलेल्या आणि कुजलेल्या अवस्थेत सापडलेल्या मयताची ओळख पटविणे आणि आरोपीताचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणणे हे मि.भा.व.वि. पोलीसांसमोर मोठे आव्हान होते. दाखल निर्घृण खुनाचा गुन्हा उघडकीस आणण्याबाबत वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे पो.नि. शाहुराज रणवरे, नेम. गुन्हे शाखा कक्ष २, वसई यांनी वेगवेगळी पाच पथके तयार करुन मिरा-भाईदंर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या मनुष्य मिसींग रजिस्टर चेक केले असता काही एक उपयुक्त माहिती प्राप्त न झाल्याने नजीकचे मुंबई, ठाणे व नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातंर्गत असलेल्या पोलीस ठाण्यातील मनुष्य मिसिंग रजिस्टर चेक केले असता यातील मयताने अंगावर परिधान केलेल्या कपडयांचे वर्णन बांगुरनगर पोलीस ठाणे, मुंबई शहर येथे दाखल असलेल्या मनुष्य मिसींग रजिस्टर नं. ५/२०२३ मधील मिसींग व्यक्तीच्या कपडयाशी जुळाल्याने त्यामधील मिसींग व्यक्तीचे नातेवाईक यांचा शोध घेवुन मिसींग व्यक्तीचे नाव कमरुददीन मोहम्मद उस्मान अन्सारी, वय ३५ वर्षे, रा. सुविधा चाळ,भगतसिंग नगर- नंबर-१, लिंकरोड, गोरेगांव, पश्चिम, मुंबई असल्याचे निष्पन्न केले. त्यावरुन मयत ईसम हा रहात असलेल्या परीसरात जावून चौकशी केली असता त्याचे शेजारी राहणारे आरोपीत पती व पत्नी १) बिलाल उर्फ मुल्ला निजाम पठाण वय ४० वर्षे, रा. सुरजा चाळ, भगतसिंग १, गोरेगांव, (पुर्व) मुंबई, मुळ रा. १९९, बंगला एरीया, मेरठ कॅन्ट, मेरठ, उत्तरप्रदेश २) सौफिया

बिलाल पठाण, वय २८ वर्षे, रा. सदर हे घटना घडल्यापासुन परिसरातुन निघुन गेल्याची माहिती प्राप्त झाल्याने त्यांचेविषयी तांत्रिक विश्लेषणाव्दारे अधिक माहिती प्राप्त केली असता ते वापी (गुजरात) या ठिकाणी असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना नमुद ठिकाणावरुन ताब्यात घेण्यात आले. त्यांना विश्वासात घेवून त्यांचेकडे सखोल चौकशी केली असता त्यांनी पैशाच्या हव्यासापोटी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. तसेच नमुद गुन्हयातील मयतास जीवे ठार मारण्याची प्रेरणा देणारी त्याची पत्नी नामे आशिया अन्सारी हीस वालीव पोलीस ठाणे यांनी ताब्यात घेतले असुन सदर गुन्हयाचा अधिक तपास वालीव पोलीस ठाणेचे पो.निरी. श्री. साबळे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, स.पो.नि. सुहास कांबळे, स.फौ.रमेश भोसले, संजय नवले, पो.हवा. रमेश अलदर, चंदन मोरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, दादा आडके, सुधीर नरळे, पोना प्रशांतकुमार ठाकुर, पो.अंम. अमोल कोरे, सर्व नेम- गुन्हे शाखा २, वसई व स.फौ. संतोष चव्हाण नेम. सायबर गुन्हे शाखा यांनी केली आहे.




------ooo-----